## निशाणी क्र. ७० वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.४ चे वारस अभिलेखावर घेणेसाठी दाखल केला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र.४ हे मुंबई येथे दि.०९/०३/२०१८ इ. रोजी मयत झाले आहेत. तरी त्यांचे वारस दाव्याचे कामी सामील करणेस परवानगी मिळावी अशी त्याने विनंती केली आहे.

२. प्रतिवादी क्र.४ च्या वारसांनी सदर अर्जास म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. वादी व प्रतिवादी क्र.४ च्या वारसांतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रतिवादी क्र. ४ हे दिनांक ०९/०३/२०१८ इ. रोजी मयत झाले आहेत, असे दिसून येते. वादी याने सदरचा अर्ज दि. १३/०६/२०१८ इ. रोजी दाखल केला आहे. वादी याने सदरचा दावा वाटपासाठी व पृथक कब्जासाठी दाखल केला आहे. सदर दाव्यास प्रतिवादी क्र. ४ चे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे सदर अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे :

### — <u>आदेश</u> —

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. नि.क्र.६८ व ६९ वरील आदेशाची पुर्तता झाल्यानंतर प्रतिवादी क्र.४ चे वारस दाव्यामध्ये समाविष्ठ करणेस परवानगी देण्यात येते.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/—
( गि. सु. माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

स्थळ : देवगड
दिनांक : २६/०९/२०१८